
पुण्यनगरी

# संख्याशास्त्राचे सामाजिक उपयोजन समजून घ्या

## कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के यांचा महाविद्यालयीन विद्यार्थ्यांशी संवाद

**कोल्हापूर : प्रतिनिधी**



संख्याशास्त्राचा उपयोग समाजाला प्रत्येक टप्प्यांवर होत असतो. त्यामुळे विद्यार्थ्यांनी संख्याशास्त्राचे दैनंदिन सामाजिक जीवनातील उपयोजन समजून घ्यायला हवे, असे प्रतिपादन शिवाजी विद्यापीठाचे कुलगुरू तथा संख्याशास्त्रज्ञ डॉ. डी. टी. शिर्के यांनी येथे केले.

शिवाजी विद्यापीठाचा संख्याशास्त्र अधिविभाग आणि केंद्रीय विज्ञान व तंत्रज्ञान विभागाचे विज्ञान व अभियांत्रिकी संशोधन मंडळ यांच्या संयुक्त विद्यमाने येथील दसरा चौकातील शाहू स्मारक भवनात संख्याशास्त्राच्या पदवीस्तरीय महाविद्यालयीन विद्यार्थ्यांसाठी आयोजित 'संख्याशास्त्राचे सामाजिक उपयोजन' व्याख्यानात ते बोलत होते.

कुलगुरू डॉ. शिर्के म्हणाले, १९ व्या शतकापासून ते अगदी समकाळापर्यंत संख्याशास्त्राच्या आधारे सामाजिक प्रश्न सोडविले गेल्याची अनेक उदाहरणे आहेत. एकोणीसाव्या शतकात आद्य परिचारिका फ्लोरेन्स नाईटिंगेल यांनी क्रिमियन युद्धातील जखमी सैनिकांची सुश्रूषा करता करता युद्धभूमीपेक्षाही रुग्णालयातील अस्वच्छता व असुविधांमुळे अधिक सैनिकांना प्राण गमवावे लागत आहेत, हे संख्याशास्त्रीय वर्तुळाकार आलेखाच्या आधारे दाखवून दिले.

डॉ. सोमनाथ पवार यांनी स्वागत, तर डॉ. एस. बी. महाडिक यांनी प्रास्ताविक केले. डॉ. संतोष सुतार यांनी आभार मानले.

तरुण भारत

# शिवाजी विद्यापीठात संख्याशास्त्र विभागाच्या वतीने व्याख्यान



कोल्हापूर : मार्गदर्शन करताना कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के. सोबत डॉ. सोमनाथ पवार, डॉ. एस. बी. महाडीक.

प्रतिनिधी
कोल्हापूर

संख्याशास्त्रांचा उपयोग समाजाच्या प्रत्येक टप्प्यावर होत असतो. संख्याशास्त्राच्या अभ्यासक, संशोधकांनी समाजाच्या समस्या सोडवण्यासाठी त्याचा वापर करावा, असे आवाहन कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के यांनी केले.

संख्याशास्त्र अधिविभाग व डिपार्टमेंट ऑफ रिसर्च सेंटरच्या संयुक्त विद्यमाने आयोजित व्याख्यानात ते बोलत होते. शाहू स्मारक भवन येथील व्याख्यानाला विविध महाविद्यालयातील विद्यार्थी व संख्याशास्त्र अभ्यासकांनी हजेरी लावली.

कुलगुरू डॉ. शिर्के म्हणाले, १९ व्या शतकापासून ते समकालीनमध्ये संख्याशास्त्राच्या आधारे सामाजिक प्रश्न सोडवले आहेत. फ्लोरेन्स नाईटिंगेल, पी. व्ही. सुखात्मे, एडवर्ड टेमिंग, सी. आर. राव आदींनी संख्याशास्त्रात भरीव योगदान दिले आहे. गरीबी कमी करण्यापासून ते दर्जा नियंत्रण, सुधारणा अशा प्रत्येक क्षेत्रात संख्याशास्त्राचा उपयोग होतो. सामाजिक भावनेतून संख्याशास्त्र विषयाकडे पाहिले पाहिजे. बदलत्या व्यवस्थेत एखाद्या विषयात 'टॉप टू बॉटम" सर्वांनी सहभाग नोंदवल्यास उत्तम निर्मिती होईल. कोणतीही व्यवस्था बदलण्यासाठी व्यवस्थापन महत्वाचे असते.

विद्यार्थ्यांनी आत्मविश्वासाने विचार मांडले तरच त्यांना आपण केलेल्या कामाचे समाधान मिळेल. एवढेच नव्हे तर योग्य मोबदलाही मिळेल. स्वागत डॉ. सोमनाथ पवार यांनी केले. प्रास्ताविक डॉ. एस. बी. महाडीक यांनी केले. संतोष सुतार यांनी आभार मानले. यावेळी शिवाजी विद्यापीठाचे जनसंपर्क प्रमुख डॉ. अलोक जत्राटकर, किशोर खिलारे, विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

1 9 MAR 2022

पुढारी

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# मराठी भाषा विकासात जैन साहित्याचे योगदान

**कोल्हापूर : पुढारी वृत्तसेवा**

प्राचीन काळापासून मराठी भाषा विकासाच्या प्रत्येक टप्प्यावर जैन साहित्याने मोलाचे योगदान दिलेले आहे, असे प्रतिपादन महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळाचे अध्यक्ष तथा ज्येष्ठ विचारवंत डॉ. सदानंद मोरे यांनी केले.

शिवाजी विद्यापीठाचे संत तुकाराम अध्यासन आणि महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळ, मुंबई यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित संत तुकाराम बीज आणि ग्रंथ प्रकाशन अशा संयुक्त कार्यक्रमात प्रमुख पाहुणे म्हणून ते बोलत होते. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी कुलगुरू डॉ. डी.टी. शिर्के होते.



**कोल्हापूर : 'संत तुकाराम बीज' ग्रंथाचे प्रकाशन करताना कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के, डॉ. सदानंद मोरे, राजन गवस, डॉ. रणधीर शिंदे, डॉ. गोमटेश्वर पाटील आदी. (छाया : पप्पू अत्तार)**

यावेळी डॉ. गोमटेश्वर पाटील यांनी संपादित केलेल्या मध्ययुगीन मराठी जैन साहित्यातील हस्तलिखित १७ संपादित ग्रंथांच्या २४ खंडांचे प्रकाशन करण्यात आले.डॉ. सदानंद मोरे म्हणाले, मराठीतील पहिला शिलालेख हा थेट श्रवणबेळगोळ येथील गोमटेश्वराच्या पायी सापडतो. छत्रपती शिवाजी महाराजांनी राज्यव्यवहार कोषाच्या निर्मितीतून त्यांनी पर्शियन भाषेला मराठी पर्यायी शब्द प्रदान केले. भारतीय परंपरांचा समग्र पट आपण समजून घ्यायला हवा. त्यासाठी त्यांचा तौलनिक अभ्यास होणे गरजेचे आहे.

डॉ. राजन गवस म्हणाले, आपल्या मठा-मंदिरांमध्ये अद्यापही हजारो हस्तलिखिते अद्यापही पडून आहेत. त्यांचे जतन, संवर्धन व संशोधन अत्यावश्यक आहे. डॉ. रणधीर शिंदे यांनी सांप्रदायिक वाङ्मयाबद्दलचा आधुनिक दृष्टिकोन बदलणारा हा प्रकल्प आहे असे सांगितले.

अध्यक्षीय भाषणात कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के म्हणाले, केवळ विद्यापीठीय आवारांमध्येच संशोधनकार्य चालते, या समजाला छेद देणारे भरीव स्वरुपाचे संशोधनकार्य डॉ. गोमटेश्वर पाटील यांनी केले आहे. नंदकुमार मोरे यांनी स्वागत केले. राजेश पाटील यांनी सूत्रसंचालन केले, तर डॉ. शरद गायकवाड यांनी आभार मानले.

1 9 MAR 2022

सकाळ

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# मराठी भाषेच्या विकासात जैन साहित्याचे योगदान

## डॉ. सदानंद मोरे : डॉ. गोमटेश पाटील संपादित मराठी जैन साहित्य खंडाचे प्रकाशन

कोल्हापूर, ता. १७ : प्राचीन काळापासून मराठी भाषा विकासाच्या प्रत्येक टप्प्यावर जैन साहित्याने मोलाचे योगदान दिले आहे, असे प्रतिपादन साहित्य आणि संस्कृती मंडळाचे अध्यक्ष डॉ. सदानंद मोरे यांनी येथे केले. इंग्रजी अभ्यासक अलेक्झांडर ग्रँट याने तुकारामांना 'भारताचे राष्ट्रकवी' असे संबोधले, तर दि. पु. चित्रे यांनी तुकारामांना जगाशी जोडत असताना त्यांचा 'जागतिक कवी' म्हणून गौरव केल्याचेही त्यांनी सांगितले.

शिवाजी विद्यापीठाचे संत तुकाराम अध्यासन आणि राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळातर्फे संत तुकाराम बीज आणि ग्रंथ प्रकाशन कार्यक्रमात ते बोलत होते. डॉ. गोमटेश्वर पाटील यांनी संपादित केलेल्या मध्ययुगीन मराठी जैन साहित्यातील हस्तलिखित १७ संपादित ग्रंथांच्या २४ खंडांचे प्रकाशन झाले. अध्यक्षस्थानी कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के होते तर लेखक डॉ. राजन गवस व मराठी अधिविभाग प्रमुख डॉ. रणधीर शिंदे उपस्थित होते. राजर्षी शाहू स्मारक भवन येथे कार्यक्रम झाला.

डॉ. मोरे म्हणाले, "सातवाहन काळात मराठी ही दरबाराची, कारभाराची व धर्माचीही भाषा होती. त्यानंतर थेट छत्रपती शिवाजी महाराजांनी स्वराज्यात मराठीला तिचे स्थान पुन्हा प्रदान केले. राज्यव्यवहार कोषाच्या निर्मितीतून त्यांनी पर्शियन भाषेला मराठी पर्यायी शब्द प्रदान केले. हे या समग्र भारतीय परंपरांचा समग्र पट आपण समजून घ्यायला हवा. त्यासाठी त्यांचा तौलनिक अभ्यास व्हायला हवा. कोल्हापूर ही संत तुकाराम महाराजांच्या शिष्या बहिणाबाई यांची साक्षात्कार भूमी आहे. तुकारामांनी वेदांचा अर्थ महाराष्ट्री भाषेत सांगितला. म्हणून बहिणाबाईंनी तुकारामांच्या अभंगांना 'तुकाराम वेद' असे संबोधले."

डॉ. गवस म्हणाले, "पाश्चात्य कथन, परंपरांचे गुणगान करणाऱ्यांनी आपल्या अस्सल व अद्भुत भारतीय कथा विश्वाकडे नजर टाकायला हवी."

डॉ. शिंदे यांनी सांप्रदायिक वाङ्मयाबद्दलचा दृष्टिकोन बदलणारा हा प्रकल्प आहे, असे सांगितले. डॉ. पाटील यांनी मध्ययुगीन जैन साहित्यात मराठी साहित्यिकांचे भरीव योगदान असल्याचे निरीक्षण नोंदविले. मानव्यविद्या विद्याशाखेचे अधिष्ठाता डॉ. आर. जी. कुलकर्णी, इतिहास अधिविभाग प्रमुख डॉ. अवनीश पाटील, प्राचार्य श्रीधर हेरवाडे, अशोक बाबर, डॉ. राजेंद्र कुंभार, डॉ. आर. पी. लोखंडे, डॉ. प्रभंजन माने उपस्थित होते. समन्वयक डॉ. नंदकुमार मोरे यांनी प्रास्ताविक केले. राजेश पाटील यांनी सूत्रसंचालन केले, तर डॉ. शरद गायकवाड यांनी आभार मानले.



**कोल्हापूर : डॉ. गोमटेश्वर पाटील संपादित मध्ययुगीन मराठी जैन साहित्यातील हस्तलिखित १७ संपादित ग्रंथांच्या २४ खंडांचे प्रकाशन करताना डॉ. सदानंद मोरे. शेजारी कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के, डॉ. रणधीर शिंदे, डॉ. राजन गवस, डॉ. गोमटेश्वर पाटील, डॉ. नंदकुमार मोरे.**

तरुण भारत

# प्रा. आर. जी. सोनकवडे वर्ल्ड सायंटिस्ट रँकिंगमध्ये

प्रतिनिधी
कोल्हापूर

शिवाजी विद्यापीठातील भौतिकशास्त्र अधिविभागातील प्रा. डॉ. आर. जी. सोनकवडे यांना 'वर्ल्ड सायंटिस्ट रँकिंग २०२२' मध्ये स्थान प्राप्त झाले आहे. नवनवीन स्तुत्य यशस्वी उपक्रमांमुळे सर्वांच्या कौतुकास पात्र ठरलेल्या डॉ. प्रा. सोनकवडे यांनी विद्यापीठाच्या शिरपेचात आणखी एक मानाचा तुरा रोवला आहे.



अमेरिकेच्या मिशिगन विद्यापीठातील प्रा. आल्फर व प्रा. डॉजर यांनी संयुक्तपणे 'आल्फर - सायंटिफिक इंडेक्स' विश्लेषित केली. जगभरातील विविध विद्यापीठांमधून संशोधकांतून होणाऱ्या निवडीमधून 'वर्ल्ड सायंटिफिक युनिव्हर्सिटी रँकिंग २०२२' जाहीर करण्यात आली आहे. यामध्ये सोनकवडे यांना संशोधकांच्या जागतिक क्रमवारीत ८०९३९४ वे आणि भारतीय क्रमवारीमध्ये ३१३३६ स्थान आहे.

**सोनकवडे यांचा परिचय**

डॉ. बाबासाहेब भीमराव आंबेडकर विद्यापीठ लखनऊ येथे स्कूल ऑफ फिजिकल सायन्सचे प्रमुख, भौतिकशास्त्र विभागाचे विभागप्रमुख, रेसिडेन्सीअल कोचिंग अकॅडमीचे संचालक, राष्ट्रीय मूल्यांकन विद्यापीठ अनुदान आयोगाच्या योजनांमध्ये महत्त्वपूर्ण योगदान. नवी दिल्लीतील न्युक्लिअर विज्ञान केंद्र येथे १८ वर्षे वरिष्ठ शास्त्रज्ञ म्हणून कार्यरत. शिवाजी विद्यापीठ कोल्हापूर येथे २०१४ पासून भौतिकशास्त्र अधिविभागात प्राध्यापक पदावर रुजू. राष्ट्रीय पातळीवर १०५ संशोधन पेपर प्रसिद्ध, त्यांच्या मार्गदर्शनाखाली नऊ विद्यार्थ्यांची पी.एचडी. पूर्ण केली असून आठ विद्यार्थी कार्यरत आहेत.

19 MAR 2022
सकाळ

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# विद्यापीठाचा महिला संघ तिसरा

## अखिल भारतीय आंतरविद्यापीठ सॉफ्टबॉल स्पर्धेत १८ वर्षांनंतर प्रथमच पात्र

कोल्हापूर, ता. १८ : अखिल भारतीय आंतरविद्यापीठ महिला सॉफ्टबॉल स्पर्धेत शिवाजी विद्यापीठाच्या महिला संघाने तिसरा क्रमांक पटकावला. सोनिपत (हरियाना) येथे दिनबंधू छोटूराम अभियांत्रिकी व तंत्र विद्यापीठात झालेल्या स्पर्धेचा बक्षीस वितरण समारंभ या विद्यापीठाचे कुलगुरू प्रोफेसर डॉ. रजनी अणायत यांच्या हस्ते झाला.

अठरा वर्षांनंतर प्रथमच साखळी फेरीसाठी पात्र ठरलेल्या शिवाजी विद्यापीठाच्या संघाने साखळी फेरीतही चांगला खेळ केला. पहिल्या सामन्यात दिल्ली विद्यापीठाचा ८-३ असा एकतर्फी पराभव केला. यामध्ये कर्णधार स्वप्नाली वायदंडे त्याचबरोबर करिष्मा कुडचे, ऐश्वर्या पुरी, दीपाली कराडे व सायली सावंत यांनी क्षेत्ररक्षण चांगले केले; पण फलंदाजीतही फटकेबाजी करत आठ धावा केल्या. शिवाजी विद्यापीठाच्या क्षेत्ररक्षणामध्ये झालेल्या गोंधळाचा फायदा घेत दिल्ली विद्यापीठाने तीन धावा केल्या.

दुसरा साखळी सामना मात्र अटीतटीचा झाला. कालिकत विद्यापीठ विरुद्ध शिवाजी विद्यापीठाच्या खेळाडूंनी पहिल्या डावात तीन धावा करून सुरुवात छान केली. फलंदाजी करताना कालिकत विद्यापीठ संघाला दीन धावा करता आल्या. त्यानंतर मात्र शिवाजी विद्यापीठाच्या संघाला एकही धाव करता आली नाही; पण स्वप्नाली वायदंडेने जोरदार पिचिंग करून कालिकत संघालाही शून्यावर बाद केले. तिसऱ्या डावात फलंदाजीत गडबड केल्याने शिवाजीचा संघही शून्यावर बाद झाला. क्षेत्ररक्षणातसुद्धा शिवाजी विद्यापीठाच्या मुख्य खेळाडूंनी अनेक चुका केल्याने कालिकत विद्यापीठाने तब्बल पाच धावा केल्या. शेवटी खेळताना फलंदाजीत शिवाजीच्या मुख्य खेळाडूंना अपयश आल्यामुळे शिवाजी विद्यापीठाचा संघ केवळ दोन धावा करू शकला. त्यामुळे कालिकत विद्यापीठाने हा सामना ७-५ असा जिंकला.

साखळी स्पर्धेतील शेवटच्या सामन्यात यजमान संघाविरुद्ध खेळताना पंचांनी दिलेल्या अनेक चुकीच्या निर्णयांचा फटका शिवाजी विद्यापीठ संघाला बसला. त्यामुळे त्यांच्याविरुद्ध पराभूत झालेल्या या संघास तृतीय स्थानावर समाधान मानावे लागले. अठरा वर्षांनंतर शिवाजी विद्यापीठाने थेट साखळी स्पर्धेसाठी पात्र ठरून तिसरा क्रमांक पटकाविला.



**सोनीपत (हरियाना) : येथे झालेल्या अखिल भारतीय आंतरविद्यापीठ महिला सॉफ्टबॉल स्पर्धेत कुलगुरू डॉ. रजनी आणायत यांच्या हस्ते तृतीय क्रमांकाचे पारितोषिक स्वीकारताना शिवाजी विद्यापीठाच्या खेळाडू, शिक्षक व संघ व्यवस्थापक.**

**संघ असा-**

स्वप्नाली वायदंडे (कर्णधार), ऐश्वर्या पुरी, करिष्मा कुडचे, वाणी ताटी, साक्षी भेंडिगिरी, निशा आईवळे, स्नेहल पाटोळे, मैथिली पाटील, सायली सावंत, दीपाली कराडे, सुजाता थोरवडे, राणी सोळवंडे, वैष्णवी मोहिते, पल्लवी कांबळे. प्रशिक्षक- ज्योती डवाळे, संघ व्यवस्थापक- प्रा. डॉ. बाबासो उलपे.

1 9 MAR 2022

तरुण भारत

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# अखिल भारतीय कयाकिंग स्पर्धेत 'जय शिवाजी'

## चंदीगडमधील स्पर्धेत शिवाजी विद्यापीठ पुरुष संघाला रौप्य व कांस्य तर महिला संघाला १ कांस्य





**कोल्हापूर : अखिल भारतीय आंतरविद्यापीठ कयाकिंग स्पर्धेत ३ पदके मिळवलेल्या शिवाजी विद्यापीठ महिला व पुरुष संघांसोबत प्रशिक्षक डॉ. धनंजय पाटील.**

प्रतिनिधी
कोल्हापूर

चंदीगड येथे झालेल्या अखिल भारतीय आंतरविद्यापीठ कयाकिंग स्पर्धेत शिवाजी विद्यापीठाच्या महिला व पुरुष संघांने देशभरातील विद्यापीठ संघांना भारी पडत वेगळा ठसा उमटवला. गेली चार महिने केलेला सराव पणाला लावत पुरुष संघाने १ रौप्य व १ कांस्य तर महिलांना संघाने १ कांस्य पदक पटकावले. ऑल इंडिया असोसिएशन ऑफ युनिव्हर्सिटी व पंजाब युनिव्हर्सिटी यांच्या वतीने स्पर्धेचे आयोजन करण्यात आले होते. चंदीगडमधील सुखना तलावात ही स्पर्धा झाली.

इचलकरंजी येथे झालेल्या आंतरविभागीय कयाकिंग स्पर्धेत चांगली कामगिरी केलेल्या खेळाडूंचा मिळून शिवाजी विद्यापीठाचा महिला व पुरुष संघ तयार केला होता. या संघांनी चंदीगडमधील अखिल भारतीय आंतरविद्यापीठ क्रयाकिंग स्पर्धेत शिवाजी विद्यापीठाची मान अभिमानाने उंचावले, अशी कामगिरी केली. पुरुषांच्या संघाने २०० मीटर के-टू या प्रकारात (एका बोटीत दोन खेळाडू) रौप्य तर २०० मीटर के-फोर (एका बोटीत चार खेळाडू) या प्रकारात कांस्य पदक मिळवून आपला दबदबा निर्माण केला. महिला संघानेही पुरुष संघाच्या पावला पाऊल टाकत २०० मीटर के-फोर या प्रकारात कांस्य पदक मिळवले.

पदक विजेत्या के-टू पुरुष संघात करण घुनके व पवन कोळी तर के-टू संघात दर्शन पोवार, श्रेयांश पाटील, करण घुणके व कौस्तुभ पोकार्डे आदींचा समावेश होता. पुरुष संघातील सर्व जण इचलकरंजीतील दत्ताजीराव कदम आर्टस्, कॉमर्स ॲण्ड सायन्स (डीकेएसी) कॉलेजचे विद्यार्थी आहेत. शालिनी पिष्टे (डॉ. डी. वाय. पाटील कॉलेज), राजनंदिनी पाटील (केआयटी कॉलेज), निकिता पिष्टे (डी. आर. माने कॉलेज) व श्रीवणी हाळीजवाळे (विवेकानंद कॉलेज) अशी कांस्य पदक विजेत्या के-फोर संघातील मुलींची नावे आहेत. या सर्व यशस्वी खेळाडूंना कुलगुरु डॉ. डी. टी. शिर्के, प्र- कुलगुरु डॉ. व्ही. एन. शिंदे, विद्यापीठ संघाचे प्रशिक्षक व आजरा महाविद्यालयाचे शारीरिक शिक्षण संचालक डॉ. धनंजय पाटील यांचे मार्गदर्शन लाभले.